
# प्राचीन इतिहास

**प्रागैतिहासिक कालखंड** : मानवी इतिहासाचा प्रारंभीक कालखंड. ( सर्वात मोठा कालखंड)

या कालखंडाला अश्मयुग म्हणतात. ( दगडाचा मोठ्या प्रमाणावर वापर)

**या कालखंडाचे तीन भाग**




## पुराश्मयुग

### पुराश्मयुगाची वैशिष्ट्ये

- पुराश्मयुगाची सुरुवात आफ्रिका खंडात सुमारे 20 लाख वर्षापूर्वी .
- मानवाचे अस्तित्व सुमारे इ. स. पू. पाच लाख वर्षापूर्वीचे.
- या कालखंडात दगडी हत्यारांचा वापर . म्हणून अश्मयुग म्हटले गेले.
- हात कुऱ्हाड हे पहिले हत्यार. ( हत्यारे ओबडधोबड) . हत्यारांचा वापर - मांसाचे तुकडे करणे , कंदमुळे काढणे.
- भारतात सापडलेली दगडी हत्यारे प्लेइस्टोसिअन कालखंडापूर्वीची नसावीत.
- राहण्यासाठी गुहांचा वापर. अवस्था रानटी.
- शिकार व अन्न गोळा करणे हे उदरनिर्वाहाचे प्रमुख मार्ग. हत्ती , हरिण, गेंडा या प्राण्याची शिकार.

## प्रारंभिक पुराश्मयुग (इ.स.पू.5 लाख ते इ.स.पू. 50 हजार )

- मोठा कालखंड .हात कुऱ्हाड, खंडकाचा व विदारणीचा इ. हत्यारांचा वापर .
- हत्यारांचे साधर्म्य पश्चिम आशिया, युरोप व आफ्रिका खंडातील हत्यारांशी मिळते जुळते

**भारतातील ठिकाणे**

- पंजाब – सोन अथवा सोहन नदीचे खोरे
- काश्मीर व थरच्या वाळवंटातील जागा
- बेलन नदीचे खोरे उत्तर प्रदेश ( मिर्झापूर)
- नर्मदा नदीचे खोरे ( मध्ये प्रदेश )
- दिधवणा – राजस्थान
- भोपाळजवळील भीमबेटका येथील अवजारे व हत्यारे इ. स. पू. एक लाख मधील असावीत .

## मध्य पुराश्मयुग (इ.स.पू. 50 हजार ते 40 हजार )

- व्यवसाय प्रामुख्याने दगडांचे पापुदरे अथवा पातळ तुकडे यावर आधारित . हत्यारे चर्ट दगडापासून बनवली जात असे.
- टोकदार हत्यारे , खणण्यासाठी पहारीसारखी हत्यारे व खुरपणी सारखी हत्यारे.
- पातेतंत्र , दाबतंत्र ,टोलातंत्र इत्यादि पद्धतींचा हत्यारे तयार करण्यासाठी वापर.

**भारतातील ठिकाणे**

- नेवासा ( अहमदनगर)
- नर्मदा नदीचे खोरे
- तुंगभद्रा नदीच्या दक्षिणेला

## उच्च पुराश्मयुग (इ.स.पू.40 हजार ते इ.स.पू. 9 हजार )

- हत्यारांचा आकार लहान व धारदार . हत्यारे गारेच्या दगडापासून .
- हाडांची व धारदार शिंगांची हत्यारे वापरत होती.
- चामड्याची वस्त्रे तयार करण्याची कला .
- हवामान उष्ण व कोरडे
- जगाच्या संदर्भात या अवस्थेची दोन वैशिष्ट्ये 1) गारगोटीचा उद्योगात वापर 2) होमो सेपियन मानवाची उत्पत्ती.

**भारतातील ठिकाणे**

- आंध्र प्रदेश , कर्नाटक, महाराष्ट्र, म. प्रदेश ,
- भोपाळजवळील भीमबेटका

# मध्याश्मयुग

व्याप्ती -इ. स. पू 9हजार ते इ. स. पू 4 हजार .

वैशिष्ट्ये :

- पुराश्मयुग व नावाश्मयुग यांना जोडणारा कालखंड.
- या काळात शिकार करून अन्न मिळवले जात होते. तसेच मासेमारी व अन्न गोळा करणे.
- सूक्ष्मास्त्रे हे प्रमुख वैशिष्ट्ये. 1 ते 8 सेंटीमीटर ची.
- मृदा भांडी बनवण्याची कला अवगत केली.

**भारतातील ठिकाणे**

- राजस्थान – 1) बागोर : कोठारी नदीवर वसलेले . याठिकाणी दगडांची छोटी हत्यारे बनवण्याचा उद्योग चालत होता. पशुपालनाचा सर्वात प्राचीन पुरावा . 2) पाचपंद्र नदी व सोजात भाग येथे सूक्ष्मास्त्रे सापडली.
- गुजरात – 1) लांगनज – सूक्ष्मास्त्रे , दफन विधी व प्राण्यांची हाडे सापडली.
- उत्तर प्रदेश - अलाहाबाद व प्रतापगड भाग.
- मध्य प्रदेश – आझम गड , भीमबेटका व होशंगाबाद
- महाराष्ट्र – 1) कोकण किनारपट्टीवर कसोल व बाबलगो येथे जलगृहे 2) पुणे , धुळे जिल्हा
- पश्चिम बंगाल – छोटा नागपुर , ब्रह्मपुत्र नदी , शिलोंगचे पठार इ.

## नवाश्मयुग

व्याप्ती -इ. स. पू10 हजार ते इ. स. पू 4 हजार .

नवाश्मयुग ही संज्ञा सर जॉन लुबाक यांनी त्यांच्या **Pre-historic** Times या पुस्तकात सन 1865 साली मांडली.

वैशिष्ट्ये :

- जगाच्या बाबतीत इ. स. पू. 9000 ला सुरुवात . भारतीय उपखंड - इ. स. पू. 7000 ला सुरुवात .उत्तर भारत - इ. स. पू. 5000 ला सुरुवात . दक्षिण भारत - इ. स. पू. 2500 ला सुरुवात .
- खेडी अस्तीत्वात होती. घरे भेंड्यांची. रस्त्यांचा अभाव, घराला मोठे अंगण, जनावरासाठी गोठा, धान्य साठवण्यसाठी रांजण.
- शेती ची सुरुवात – पेरणीचे तंत्र विकसित . गहू , बार्ली, कडधान्ये व कुळीथ यांची लागवड .
- पशुपालन –दुधासाठी गाई शेळ्या मेंढया तर मशागत करण्यासाठी बैलाची आवश्यकता .
- हत्यारे- चमकदार , गुळगुळीत व धारदार होती. त्यात कुऱ्हाडि , फरश्या, छिन्न्या , वकस, हतोडे, बाणाग्रे . दगडी फावडा व दगडी सळई जमीन खोडण्यासाठी वापरली.
- वस्त्रे- विणकाम कला विकसीत . सूती, लोकरी, चामड्याचे , वनस्पति सालीचे कपडे वापरत.
- अलंकार- विविध प्रकारच्या मण्यांपासून आभूषणे. त्यामधे शंख, माती, दगड, गारगोटी, गोमेध, हस्तिदंत इ चा समावेश.
- मृदा भांडी सर्वप्रथम या काळात अस्तीत्वात आली.
- कला – मातीच्या भांड्यावर रंगकाम व चित्रकला केली जाई.
- व्यापार _ व्यापारास वाव कमी. तरी गुरे तसेच मणी यांची खरेदी विक्री केली जात होती.
- धर्मसंकल्पना – जमीन , जल, सूर्य , पर्जन्य , यांना देवत्व आले. देवतांची मंदिरे उभारण्यास आरंभ . धर्मगुरू च्या वर्गाचा उदय.
- सापडलेल्या कुऱ्हाडीच्या आकरा वरून तीन भाग
  1) आयतकृती व वक्राकार काप असलेली कुऱ्हाड – वायव्य भारत
  2) आयताकृती गुळगुळीत दगडी कुऱ्हाड - ईशान्य भारत
  3) अंडाकृती बाजू व टोकदार पाते असलेली कुऱ्हाड - दक्षिण भारत

**भारतातील ठिकाणे**

- काश्मीर - 1) बुर्जहोम – भूर्ज वृक्षाचे स्थान असा अर्थ . श्रीनगरच्या वायव्येला . लोकांची वस्ती सरोवराच्या बाजूला . शेतीचा परिचय असावा .पाळीव कुत्रा मालकासोबत दफन करण्यात येत असे. 2) गुफ्रकाल – कुंभाराची गुहा असास अर्थ . हे दुसरे ठिकाण
- बिहार- 1) चिरान्द – हाडाची हत्यारे आढळली
- दक्षिण भारत- ग्रेनाइटच्या टेकड्या वर व नदी किनारी वस्ती . कर्नाटक , ता. नाडू , आं. प्रदेश .
- आसाम – मेघालयातील गारो टेकड्यांवर
- उत्तर प्रदेश- 1) अलाहाबाद जिल्ह्यात तांदळाची शेती . इ. स. पू 6000 मध्ये .

## ताम्रपाषाण संस्कृती( इ. स. पू. 1800 ते इ. स. पू. 1000)

- नवाश्म युगाच्या अंतिम टप्प्यात धातूचा वापर सुरू.
- तांबे हा पहिला धातू मानवाने वापरला. तांबे या धातू सोबत दगडाचा वापर म्हणून ताम्रपाषाण म्हणले गेले.
- ताम्र पाषाण संस्कृतीचा भारतातील उदय हडप्पा संस्कृती नंतरचा . ( हडपा कालीन लोक कांस्याचा वापर करत)

**<u>ताम्रपाषाण संस्कृतीची वैशिष्ट्ये :</u>**

- विविध प्रकारच्या मातीच्या भांड्यांचा वापर. लाल काळ्या रंगांची भांडी.
- तांब्याच्या व गेरू रंगाच्या संस्कृती चा काळ ( इ. स. पू 2000 ते इ.स.पू. 1500)
- घरे : भाजलेल्या विटांची मातीने लिंपलेली व छप्पर असलेली.
- कृषि व पशुपालन चालत होते.
- पूर्व बिहार व पश्चिम बंगाल येथे मासे पकडण्याचे गळ व तांदूळ सापडले.
- उंटाचे अवशेष सापडले. घोडा या प्राण्याचा परिचय नव्हता.
- कला व शिक्षण : लोक तांब्याच्या वस्तु बनवण्यात निपुण . दगडी शिल्प बनवत.
- कापड विणण्याची कला अवगत ( माळवा येथे चरखा सापडला)
- इनामगाव येथे विविध कारागीर राहत असावेत उदा. कुंभार, मूर्तिकार, हस्तिदंतावर काम करणारे.
- धार्मिक जीवन : मातृदेवतेची मूर्ति ( इनामगाव येथे ) सापडली. मातृपूजक असावेत. राजस्थान व माळवा येथे बैलाच्या मूर्ति सापडल्या.
- दफन विधी : मृतांना कलशात ठेवत. स्वत: च्या घरात , उत्तरा- दक्षिण स्थितीत, दफन केले जाई . मातीच्या व तांब्याच्या वस्तू त्यासोबत पुरल्या जात. पश्चिम महाराष्ट्रात मोठ्या संख्येने पुरलेल्या मुलांच्या संख्येवरून बालमृत्युचे प्रमाण अधिक असावे.
- हत्यारे: दगडाची छोटी अवजारे व हत्यारे. तांब्याच्या वस्तु देखील सापडल्या आहेत. अहर या ठिकाणी प्रगलन ( smelting) व धातुविज्ञान चालत असे.

## ताम्रपाषाण काळातील प्रादेशिक संस्कृत्या:

| संस्कृती | ठिकाण |
|---|---|
| कायथा संस्कृती | नर्मदा व तापी खोरे |
| अहर / बनास संस्कृती | राजस्थान |
| सावळदा संस्कृती | महाराष्ट्र |
| माळवा संस्कृती | मध्य प्रदेश व महाराष्ट्र |
| प्रभास संस्कृती | गुजरात |
| रंगपूर संस्कृती | गुजरात |
| चिरंड संस्कृती | उत्तर बिहार |
| जोर्वे संस्कृती | महाराष्ट्र |

## भारतातील ठिकाणे

- अत्रंजीखेडा - उत्तर प्रदेश – गेरु रंगाची मृदभांडी विशेष प्रसिद्ध.
- अहर – राजस्थान – पांढऱ्या रंगाने चित्रित केलेले केलेले कोणयुक्त वाडगे या स्थळाचे वैशिष्ट्य .
- अलामगिरपूर – उत्तर प्रदेश – गंगा यमुना दोआब . सिद्धू संस्कृतीतील भांडी
- कायथा – मध्य प्रदेश – तांबडी मृदभांडी, तांब्याच्या कुऱ्हाडी , मण्यांच्या माळा हडप्पा शी संपर्क सिद्ध करतात. रकताष्म व स्टेइटाइट चे मणी सापडले.
- आमरी – पाकिस्तान – खापरे उपलब्ध

## महाराष्ट्रातील ताम्रपाषाण संस्कृतीची महत्वाची ठिकाणे.

- जोर्वे : संगमणेर जवळ प्रवरा नदीवरील ठिकाण . येथे आतापर्यंत 200 जागा सापडल्या. तांब्याच्या आयतकृती कुऱ्हाडी व छिन्न्या सापडल्या.
- दायमाबाद: अहमदनगर जिल्हयातील ठिकाण येथे तीन अवस्था दिसून येतात. नवाश्मयुग, हडप्पा संसृती आणि ताम्रपाषाण संस्कृती. जोर्वे संस्कृतीतील सर्वात मोठे ठिकाण .कास्यांच्या अनेक वस्तु सापडल्या . काळ्या रंगाची मृदा भांडी, बार्ली व मूग पिकांचे अवशेष सापडले.
- नेवासा: गोदावरी नदीवरील ठिकाण. तोटी असलेली भांडी, कुंडे, पसरट मडकी इ सापडले.
- इनामगाव : पुणे जिल्ह्यातील जोर्वे संस्कृतीतील ठिकाण . मोठी घरे व चुली आढळल्या . घरे गोलाकार व खड्ड्यात उभारलेली. इ. स. पू. 1300 ते इ.स.पू. 1000 या काळातील 5 खोल्यांचे घर सापडले.तटबंदी होती . अनेक कारागीर राहत असावेत.
- चांदोली : दगडी पाती , तांब्याच्या कुऱ्हाडी व छिन्न्या अपाडल्या.
- सावळदा : धुले जिल्ह्यात तापी नदीवरील ठिकाण.


## महाराष्ट्रातील महापाषाण संस्कृती

- कालखंड इ .स.पू. 1000
- ही लोहयुगीन संस्कृती आहे.
- मृत्यूनंतर मृताच्या आवडीच्या वस्तु पुरल्या जात व त्याची स्मृती म्हणून मोठा दगड ठेवला जाई .
- मातीची घरे, कच्छया विटाची घरे. कुडांनी बांधलेली निवारे .

- अलंकार म्हणून दगडी मणी , नील मणी  यांचा वापर. सोने, चांदी , कांस्य या धातूचे अलंकार.
- गहू, ज्वारी, बाजारी, उडीद , तांदूळ ही पिके
- मृदाभांडी बनवने , चित्रकला, नक्षीकाम अवगत.

ठिकाणे - 1) रंजाळा ( धुळे )    2) बहाळ व टेकवाडे  ( जळगाव )   4 ) महारजरी ( नागपुर)  5) नैकुंड ( विदर्भ)
नैकुंड  येथे लोहशुद्ध करण्याची भट्टी सापडली.

## हडप्पा संस्कृती(इ. स. पू. 2700 ते इ. स. पू. 1500)




- ✓ ही कास्ययुगीन संस्कृती होती.
- ✓ सिंधु नदीच्या किनारी असल्याने सिंधु संस्कृती  म्हणतात.
- ✓ सर्वप्रथम हडप्पा हे ठिकाण शोधले गेले म्हणून हडप्पा संस्कृती म्हणतात.
- ✓ विस्तार  पश्चिमे कडून सुतकाजेनदोर पासून  पूर्वेकडे उत्तर प्रदेशातील आलमगीरपूर पर्यन्त तर उत्तरेकडील जम्मू  मधील मंडा पासून दक्षिणेकडे महाराष्ट्रातील दायमाबाद पर्यन्त

### घरे आणि नगररचना

- हडप्पा संस्कृतीच्या लोकांची घरे आणि इतर बांधकामे प्रामुख्याने भाजक्या विटांची. काही ठिकाणी कच्च्या विटा आणि दगडांचा वापरही बांधकामासाठी केला जाई.
- मधोमध चौक आणि त्याभोवती खोल्या अशा प्रकारची घरांची रचना असे.
- नगरांना सरक्षक तटबंदी असे. हडप्पा व मोहेंजोदडो येथे किल्ले होते.
- घरांच्या आवारात विहिरी, स्नानगृहे, शौचालये असत.
- सांडपाणी वाहून नेण्याची उत्तम व्यवस्था असे. त्यासाठी मातीच्या भाजक्या पन्हाळींचा उपयोग केला जाई.
- रस्त्यावरील गटारे विटांनी बांधून काढलेली असत. ती झाकलेली असत. यावरून सार्वजनिक आरोग्याबद्दल ते किती जागरूक होते ते दिसते.
- मोहेंजोदडो यथे एक प्रशस्त स्नानगृह सापडले आहे.

- महास्नानगृहातील स्नानकुंड जवळजवळ २९.  मीटर खोल होतेत्याची लांबी सुमारे १२ मीटर आणि रुंदी सुमारे ७ मीटर . .त्यात उतरण्यासाठी व्यवस्था होती .कुंडातील पाणी झिरपून जाऊ नये म्हणून ते आतून पक्क्या विटांनी बांधलेले होते .होती तसेच त्यातील पाणी वेळोवेळी बदलण्याची सोय



## मुद्रा-भांडी


- हडप्पा संस्कृतीच्या मुद्रा प्राधान्याने चौरस आकाराच्या त्यात प्राण्यांची चित्रे व लिखाण असे आयतकृती मुद्रांवर फक्त लिखाण असे.
- स्टिएटाईट नावाच्या दगडापासून बनवल्या जात. मुद्रांवर विविध प्राण्यांच्या आकृती आहेत. त्यांमध्ये बैल, म्हैस, हत्ती, गेंडा, वाघ यांसारखे खरेखुरे प्राणी आणि एकशृंगासारखे कल्पित प्राणी( युनिकोर्न ) पाहायला मिळतात. इतर प्राण्यांच्या आकतींप्रमाणेच मनुष्याकृतीही आढळतात.
- या मुद्रा ठसा उमटवण्यासाठी वापरल्या जात.
- मोहेंजोदडो मधील काही मुद्रा सुमेरियन मुद्रांशी मिळत्या जुळत्या होत्या.

- हडप्पा संस्कृतीच्या स्थळांच्या उत्खननातून विविध प्रकारची आणि आकारांची भांडी मिळाली आहेत.
- चाकाच्या साह्याने भांडी बनवत  त्यांमध्ये लाल रंगाच्या पृष्ठभागावर काळ्या रंगाने नक्षी काढलेली भांडी आहेत. नक्षीच्या नमुन्यांमध्ये माशांचे खवले, एकमेकांत गुंतलेली वर्तुळे, पिंपळपान यांसारख्या प्रतीकांचा समावेश आहे.
- हडप्पा संस्कृतीचे लोक मृत व्यक्तीचे दफन करताना त्या व्यक्तीच्या शवाबरोबर मातीची भांडी पुरत



## सामाजिक व धार्मिक जीवन :

- राज्यकर्ता वर्ग , व्यापारी वर्ग व सामान्य वर्ग .
- शेती व व्यापार समाज जीवनाचा महतवाचा भाग .
- अंतर्गत व बाहय व्यापार चालत असे.
- स्त्री व पुरुष सौंदर्य प्रसाधंनाचा वापर करत. आरसे व कंगवे सापडले. बाजूबंद, बांगड्या , अंगठ्या, नथणि, बाळी, पायबेज, करथणी. स्त्रिया दंडापर्यंत बांगड्या घालत  .हडप्पाकालीन कलेचा उत्ष्ट नमुना म्हणजे तेथे सापडलला एक वैशिष्ट्यपूर्ण पुतळा त्याच्या चेहऱ्याचा प्रत्येक .तपशील अत्यंत सुस्पष्ट आहे, एवढेच नव्हे तर त्याने खांद्यावरून घेतलेली शाल आणि त्या शालीवरील त्रिदलाची नक्षीही अत्यंत सुंदर रीतीने दाखवली आहे.

- 

## धार्मिक संकल्पना :

- स्त्रियांच्या टेराकोटा मूर्ति सापडल्या. मातृदेवता मानत  असावेत. पशुपति नाग बैल यांची पुजा केली जात असे.
- पुरुषदेवतेची  एक मुद्रा सापडली. त्याच्या सभोवताली हत्ती वाघ गेंडा हे प्राणी आहेत.
- लिंग स्वरुपातील पूजा रूढ होती. शांनूच्या किंवा दंडगोल आकाराच्या अनेक आकृती मिळाल्या.
- यावरून लोक मूर्तिपूजक होते. प्राणी व झाडांची पूजा केली जात. मंदिराचे अस्तित्व दिसून येत नाही.
- मृतांचे दफन केले जात असे.  मृतदेह उत्तर दक्षिण दिशेत पुरले जात.
- ताईत विपुल प्रमाणात सापडले.
- मुद्रावर स्वस्तिक चिन्ह व नागाचे चिन्ह दिसून आले.  त्यावर प्राण्याची व पक्ष्यांची चित्रे दिसून आली.
- निसर्ग पूजक होते. वृक्ष, अग्नि व जल. पिंपळ वृक्षाला विशेष धार्मिक महत्व. शिक्क्यांवरील स्वस्तिक व चक्र ही प्रतीके सूर्यासाठी असावीत.
- 

## लिपी :

इ. स. 1853 मध्ये हडप्पा लिपी सापडली. लिपी चित्रात्मक . उजवीकडून डावीकडे लिहिली जात असे. जवळपास 250 ते 400 इतक्या चित्रलिपी सापडल्या.

## वजन व मापे.

व्यापारात देवाण घेवाण करण्यासाठी . वजणे दगडाची. सर्वात छोटे वजन 13.64 ग्राम . वजन मापे 16 च्या पटीत. मोजमापसाठी कांस्य पासून बनवलेल्या सळईचा उपयोग.

## तंत्रज्ञान व शिल्पकला :

- कांस्य धातूचा वापर जास्त.
- दगडाचा तसेच तांबे , टिन, सोने, चांदीचा वापर.
- कारागीर वर्गाचे अस्तित्व
- 1) तांबे- राजस्थान मधील खेत्री खाणीतून  , राजपुताना.
  2) टिन – अफगाणिस्तान मधून
- शंख , शिंपले, कवड्या – काठीयवाडचा समुद्र किनारा
  3) सोने चांदी - अफगाणिस्तान मधून
  4) मौल्यवान दगड – दक्षिण भारतातून

## व्यापार :

- अंतर्गत व्यापार  -:  राजस्थान , सौराष्ट्र, महाराष्ट्र, उत्तर प्रदेश , दक्षिण भारत.

- बाह्य व्यापार -: मेसोपोटेमिया ( सध्याचे इराक)
- व्यापार वस्तुविनिमय पद्धतीवर : लांब पल्ल्याचा व्यापार नीलाष्म मध्ये.
- दळनवळनासाठी बैलगाड्यांचा वापर.
- सिंधूच्या खोऱ्यात चांगल्या दर्जाचा कापूस होत असेतो पश्चिम आशिया ., दक्षिण युरोप आणि इजिप्त या प्रदेशांना निर्यात होत असे सुती कापड देखील निर्यात होत .असेइजिप्तमध्ये मलमलीचे कापड हडप्पा संस्कृतीचे व्यापारी पुरवत असत .
- लोथल यथे प्रचंड आकाराची गोदी सापडली आहे

## कृषि जीवन :

- शेती प्रमुख व्यवसाय . सुपीक जमिनी.
- नोव्हेंबर महिन्यात पेरणी व एप्रिल मध्ये काढणी. ( दगडी कोयत्याच्या साह्याने)
- लाकडी नांगरचा वापर करत असावेत.
- इ. स. पू. 1800 : लोथल ( गुजरात)येथे तांदळाचे उत्पादन होत असावे.
- धान्याची कोठेरे सापडली आहेत.
- बनवाली येथे बार्ली या पिकाचे अवशेष मोठ्या प्रमाणात सापडले.
- शेतकऱ्यांकडून कर रूपाने तृणधान्ये घेतले जात असावे.

## पशुपालन :

- मुद्रांवर प्राण्याची चित्रे.
- बैल ,गाय , म्हैस, हत्ती, डुक्कर, कुत्रा, मंजर, ससा, माकड, हरिण , कोंबड्या , मोर. इ.
- सुरकोतडा येथे घोड्याचे अवशेष आढळून आले.
- सिंह, घोडा या प्राण्याची ओळख नव्हती .

## ऱ्हासाची कारणे

- पुन्हा पुन्हा येणारे महापूर,
- बाहेरून आलेल्या टोळ्यांची आक्रमणे,
- व्यापारातील घट यांसारख्या गोष्टी हडप्पा सस्कृतीचा ऱ्हास होण्यास कारणीभूत होत्या.
- त्याचबरोबर पर्जन्यमान कमी होणे,
- नद्यांची पात्र कोरडी पडणे,
- भूकंप,
- समुद्रपातळीतील बदल यांसारख्या कारणांमुळेही काही स्थळे उजाड झाली. अशा कारणांमुळे लोकांनी मोठ्या प्रमाणावर स्थलांतर केले आणि हडप्पा सस्कृतीमधील शहरांचा ऱ्हास झाला.

➢ **या संस्कृतीतील महत्वाची ठिकाणे** :

**हडप्पा -**

- शोधली गेलेले पहिले शहर : उत्खनन- 1921 दयाराम साहणी.
- पूर्व पंजाब मधील मोण्टगोमरी जिल्यात रावी नदीच्या किनाऱ्यावर.
- शहराची विभागणी दोन भागात - किल्ला आणि पायथ्याचे शहर
- सहा धान्याची कोठारे सापडली. दोन ओळीत. त्याच्या बाजूला वर्तुळाकार जागा. धान्य वर प्रक्रिया करण्यासाठी
- शवपेटी सापडली.
- मजुरांच्या खोल्यांची वस्ती.
- हरिनाचा पाठलाग करत असलेल्या कुत्र्याची कास्यांची मूर्ति.
- मातीची तसेच कास्यांची बैलगाडी.
- दगडाची पुरुषाची नृत्य करताना नग्न मूर्ति तसेच पुरुषाचे एक दगडी शिल्प सापडले.

**मोहेंजोदडो**

- 1922 साली राखलदास बॅनर्जी यांनी शोधले. 1925.26 साली के.एन. दीक्षित यांनी उत्खनन केले.
- अर्थ होतो – मृतांची टेकडी . ( सर्वात मोठे ठिकाण)
- स्थान : पाकिस्तान- सिंध प्रांता-लारखाना जिल्हा
- सर्वात मोठे धण्याचे कोठार, महास्नान गृह , आयतकृती शहर .
- नाचणाऱ्या मुलीची कास्यांची मूर्ति. कास्यांची म्हैस . मेसोपोटेमियन काळातील लंब गोलाकार नाणे. कापसाच्या विणलेला तुकडा.
- दाढी असलेली दगडी मूर्ती.
- सर्वाधिक नाणी येथून प्राप्त.

**लोथल :**

- गुजरात अहमदाबाद जिल्हा . भोगावा नदीकिनारी.
- 1957 साली आर. एस. राव यांनी उत्खनन केले.
- मुख्य बंदर. येथून परकीय व्यापार चालत असे.
- कृत्रिम धक्का, शहराच्या पूर्वेला .
- तांदळाचा पुरावा. इ.स.पू. 1800
- पर्शियन मुद्रा सापडली,शिंपल्याचे दुकान , धातू काम करणारे तसेच मणी बनविणारे कारागीर असन्याचे पुरावे. हस्तिदंत सापडले. तसेच ममी आढळून आले. चतुर कोल्हयाची गोष्ट भांडयवर दिसून आली. वजन मापे सापडली.

**धोलवीरा:**

- गुजरात – कच्छ जिल्हा.
- 1967.68 साली जे.पी. जोशी यांनी उत्खनन केले.
- 1990.91 साली आर एस बिस्त यांनी उत्खनन केले.
- भारतातील हडप्पा संस्कृतीचे सर्वात मोठे ठिकाण.
- शहर तीन भागात : किल्ला , मध्य भाग, व निम्न भाग.
- मोठे प्रेक्षागृह सापडले. सोळा तळी तसेच साईन बोर्ड्स सापडले.

**बानवली :**

- हरियाणा – हिस्सार जिल्हा .
- आर.एस. बिस्त 1973 साली उत्खनन
- उत्तम प्रतीची बार्ली ( सातू ) या ठिकाणी होत होते.
- मातीचा नांगरचा फाळ सापडला.

**रोपार** :

- पंजाब मधील सतलज नदीवरील ठिकाण.
- शोध यज्ञदत्ता शर्मा 1953
- मृतसोबत कुत्रा प्राणी पुरल्याचे अवशेष.

**भगवानपुरा :**

- हरियाणा – कुरुक्षेत्र
- कार्यकाळ - इ.स. पू. 1600 ते - इ.स. पू. 1000

**रंगपूर –**

**राखीगढ :**

- हरियाणा – घग्गर नदीवर.
- हडप्पा संस्कृतीच्या तिन्ही अवस्था. ( पूर्व , परिपक्व व उत्तर )

**आलमगिरपूर :**

- उत्तर प्रदेश , मेरठ जिल्हा
- शोध – यज्ञदत्त शर्मा : 1958
- यमुनेच्या पलीकडे असलेले (पूर्वे) एकमेव ठिकाण

सुरकोटडा :

- गुजरात भुज जिल्ह्यातील कच्छ भागातील
- शोध – जगपती जोशी 1964
- मणी तयार करण्याचे उद्योग व घोड्याची हाडे सापडली. शहराला तटबंदी .

**कोटदिजी :**

- पाकिस्तान – सिंध प्रांत – सिंधू नदी.
- शोध घुर्ये यांनी लावला.
- चाकावरील मृदाभांडी .

**सुतकाजेन्डोर:**

- पाकिस्तान मधील बलुचिस्तान प्रांत.
- शोध औरेल स्टेइन – 1927
- व्यापारी चौकी म्हणून सर्वात पश्चिमेकडील ठिकाण.